# महाराष्ट्र विधानसभा

**द्वितीय अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील श्री आई तुळजाभवानी मंदिर तिर्थक्षेत्राचा केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयांतर्गत प्रसाद योजनेमध्ये समावेश करण्याबाबत

**(१) ३३८५३ (१२-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील श्री आई तुळजाभवानी मंदिर ‘अ’ वर्ग तिर्थक्षेत्र येथे नवरात्र व कोजागिरी पोर्णिमेला मोठा धार्मिक उत्सव साजरा करण्यात येत असून यासाठी देशभरातून लाखो भाविक/भक्त दर्शनास येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापूर येथे अनेक पुरातन मंदिरे तसेच ऐतिहासिक वास्तु असल्याने गृहमंत्री ना.श्री. अमित शहा यांनी तुळजापूरला वैश्विक पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याचा मानस व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुळजाभवानी मंदिर तिर्थक्षेत्राचा केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालय अंतर्गत ‘प्रसाद’ योजनेमध्ये समावेश करण्यासाठी प्रस्ताव तयार करून पाठविण्याबाबत बैठक घेण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा. पर्यटन मंत्र्यांना वारंवार पत्र व्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाच्या प्रसाद योजनेंतर्गत पर्यटक वाढीसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती, रोजगार निर्मिती, पर्यटन क्षेत्राबाबत जागरुकता वाढविणे, कौशल्य् विकास, पर्यटन वाढविण्यासाठी क्षमता निर्माण करणे, येणाऱ्या पर्यटकांना मुल्य वर्धित सेवा पुरविणे अशा अनेक बाबींचा समावेश असून या योजनेला संपूर्णतः केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तुळजाभवानी मंदिर तिर्थ क्षेत्राचा पर्यटन विकास व त्या माध्यमातून रोजगार निर्मिती होणार असल्याने सदर प्रकरणात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (११-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) श्री तुळजाभवानी मंदिर व परिसराचा साईट मॅनेजमेंट प्लॅन तयार करण्यासाठी वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली असून त्यामध्ये प्रसाद योजनेच्या आराखड्याचे काम समाविष्ट आहे.यासंबंधी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंदखेडराजा पर्यटन विकास आराखड्याला निधी उपलब्ध करण्याबाबत

**(२) ३८०४७ (०९-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा पर्यटन विकास आराखड्यास महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्रमांक टीडीएस २०१५/३ /प्रक्र १८७/ पर्यटन दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील शासन निर्णय मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच तत्कालीन माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सिंदखेडराजा विकास आराखड्याच्या अनुषंगाने दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास झालेल्या शिखर

समितीत उपरोक्त विकास आराखड्यातील प्रथम टप्प्यासाठी रुपये २५ कोटी मान्य करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही २५ कोटी रुपयांची कामे संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने पूर्ण केलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंदखेडराजा पर्यटन विकास आराखड्यातील कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (११-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि.३१.०३.२०१७ अन्वये सिंदखेडराजा, जि. बुलढाणा येथील राजमाता जिजाऊ जन्मस्थळ सिंदखेडराजा पर्यटन विकासाच्या रु.२४.९३ कोटीच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) सदर आराखड्यातील राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत लखुजीराव जाधव राजवाडा, सावकार वाडा, रंगमहाल, निळकंठेश्वर मंदिर, काळाकोट ही रु.१२.९६ कोटीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच आराखड्यातील उर्वरित कामे पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर शहरातील रामाळा तलावावर पादचारी पुलाची बांधणी करण्याकरीता निधी मंजूरीबाबत

**(३) ४०३६० (०९-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील रामाळा तलावावर पादचारी पुलाची बांधणी करण्याकरीता निधी मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यटन मंत्री यांच्याकडे दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी व तद्पूर्वी अनेकदा लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने सदर पुलाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने आतापर्यत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. तसेच सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (११-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर कामास विभागाच्या दिनांक २८/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.४१८.११ लक्ष एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिली असून एकूण रु.१०७.२१ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सद्यस्थितीत काम निविदा प्रक्रिया स्तरावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## तोरणमाळ (जि.नंदुरबार) या पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) ४४८७३ (१७-०९-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोरणमाळ (जि.नंदुरबार) या पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी रुपये ५ कोटी १७ लक्ष निधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (११-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तोरणमाळ गिरीस्थानाच्या पर्यटन विकासाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्यामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एम.टी.डी.सी.) महाबळेश्वर, माथेरानसह अन्य पाच ठिकाणी असलेल्या जागेवरील रिसॉर्ट खासगी उद्योजकांना देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत**

**(५) ४६८५८ (१७-०९-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) महाबळेश्वर, माथेरानसह अन्य पाच ठिकाणी असलेल्या मोक्याच्या जागेवरील रिसॉर्ट खासगी उद्योजकांना देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक २६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे पुरेसे मनुष्यबळ आणि व्यवस्थापन यंत्रणा असतांनाही रिसॉर्ट खासगी उद्योजकांना देण्याचा निर्णय घेतल्यामुळे स्थानिक कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (११-०४-२०२३) :** (१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि.१७.०८.२०२० अन्वये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा खाजगीकरणाच्या माध्यमातून पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या धोरणास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये प्रथम टप्प्यात गणपतीपुळे, माथेरान, महाबळेश्वर, हरिहरेश्वर (जि. रायगड) व मिठबाव (जि. सिंधुदुर्ग) येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे रिसॉर्टस् व ताडोबा आणि फर्दापूर (जि. औरंगाबाद) येथील मोकळ्या जमिनींचा समावेश आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हा क्रीडा समिती तर्फे काढण्यात आलेल्या जलतरण तलावाच्या निविदा प्रक्रियेला स्थगिती मिळण्याबाबत**

**(६) ४७२९० (२८-१०-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हा क्रीडा समितीतर्फे जलतरण तलावाच्या एका पाठोपाठ दोन निविदा काढण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या निविदेमध्ये वार्षिक करारनाम्याची किंमत ११ लक्ष प्रती वर्ष याप्रमाणे (३ वर्षांकरीता) मागविण्यात आल्या यामध्ये ४ ते ५ इच्छुक कंत्राटदार यांनी निविदा सादर केल्या, परंतु सदर निविदा प्रलंबित ठेवून नवीन निविदा मागविण्यात आली असून नवीन निविदेमध्ये वार्षिक करारनाम्याची किंमत फक्त ६ लक्ष प्रती वर्ष याप्रमाणे (५ वर्षांकरीता) मागविण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जुनी निविदा रद्द करण्याचे किंवा प्रलंबित ठेवण्याचे कुठलेच कारण न देता नवीन निविदा सुधारीत अटी व शर्ती लागू करुन प्रसिद्ध करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार निविदा प्रक्रिया रद्द करुन संबंधीत दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०४-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अकोला जिल्ह्यामध्ये एकच जलतरण तलाव असल्याने तसेच अधिकाधिक जलतरण खेळाडू निर्माण करणे या उद्देशाच्या अनुषंगाने तसेच इतर जिल्ह्यातील जलतरण तलावांची वार्षिक आकारणी यांचा विचार करून जिल्हा क्रीडा संकुल समिती, अकोला यांच्या दिनांक ०४.०४.२०२२ रोजी पार पाडलेल्या बैठकीत यापूर्वीच्या ई-निवीदा प्रक्रिया रद्द करून पुनश्च निविदा प्रसिध्द करावी,असे निर्देशित करण्यात आले. त्यानुसार प्रथम निविदा प्रक्रिया रद्द करून दुसऱ्यांदा माहे एप्रिल २०२२ मध्ये महाटेंडर या शासकीय प्रणालीव्दारे निविदा प्रसिध्द करून ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. सदर निविदा प्रक्रियेत पात्र ठरलेल्या निविदा धारकास जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या मान्यतेने ०५ वर्षाकरीता रू.७,३०,००० देकार रक्कम प्रति वार्षिक दरानुसार जलतरण तलाव चालविण्याकरिता देण्यात आला.सद्यस्थितीत खेळाडू व नागरीकांकडून या जलतरण तलावाचा वापर सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नांदाफाटा येथील हरीश सिंग राठोड याचा अपघातात मृत पावलेल्या कामगाराच्या पत्नीला विम्याची रक्कम मिळण्याबाबत**

**(७) ४८११५ (०९-११-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नांदाफाटा येथील श्रीवास्तव कंन्स्ट्रक्शन कंपनीतील ठेकेदारीवर काम करणाऱ्या हरीश सिंग राठोड या कामगाराचा दिनांक ६ मे,२०११ रोजी वा त्यासुमारास सायकलने कामावर जात असताना ट्रक अपघातात जागीच मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी त्यांच्या मृत्यूनंतर विम्याची रक्कम मिळाली नसल्यामुळे मृतकाची पत्नी मंजूकवर राठोड यांनी २२ जानेवारी,२०१३ रोजी वा त्यासुमारास मा.न्यायालय चंद्रपूर येथे विम्याची रक्कम मिळण्यासाठी दाद मागितली होती व न्यायालयाने ५ जुलै,२०१४ रोजी मृतकाच्या पत्नीच्या बाजूने निकाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणास ८ वर्षे उलटूनही अद्यापपर्यंत कन्स्ट्रकशन कंपनीकडून मृत कुटूंबाच्या कुटूंबियांना ५ लाख ५३ हजार ९२७ रुपये भरपाईची रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय, तसेच अशाप्रकारे अनेक विमाधारकाची प्रकरणे निदर्शनास येत असून विम्याचा परतावा न देणाऱ्या विम्या कंपनीवर शासनाने कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील कर्मचाऱ्याच्या कुटुंबियाला कन्स्ट्रक्शन कंपनीकडून सव्याज नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२८-०३-२०२३) :** (१) कोरपना (जि. चंद्रपूर) तालुक्यातील नांदाफाटा येथील हरीश सिंग राठोड या श्रीवास्तव कंन्स्ट्रक्शन कंपनीतील ठेकेदारीवर काम करणाऱ्या कामगाराचा दिनांक ६ मे, २०११ रोजी सायकलने कामावर जात असताना ट्रक अपघातात जागीच मृत्यू झाला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी दिनांक ५/७/२०१४ च्या कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, चंद्रपूर यांनी दिलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना वसूली प्रमाणपत्र पाठविण्यात आले. त्यावर मे. श्रीवास्तव कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियमांतर्गत कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, चंद्रपूर यांच्याकडे संकीर्ण प्रकरण क्र. ७/२०१५

दाखल केले. सदर प्रकरणात कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, चंद्रपूर यांनी असे आदेश दिले की, दिनांक १९/१०/२०१२ च्या कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, चंद्रपूर यांच्या आदेशांच्या अनुषंगाने वीस दिवसांच्या आत कारवाई करण्यात यावी. या आदेशांना स्थगिती देण्यासाठी मा. उच्च न्यायालय, नागपूर यांच्याकडे मे. श्रीवास्तव कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी दाद मागितली. मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी असे अंतिम आदेश दिले की, दोन्ही पक्षांनी दिनांक ३/२/२०२० पूर्वी कामगार न्यायालयासमोर हजर रहावे व कामगार न्यायालयाने प्रकरण क्र. ७/२०१५ दिनांक ३०/६/२०२० पूर्वी त्वरित निकाली काढावे.

सदर आदेशांनुसार मे. श्रीवास्तव कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी पुढील कार्यवाहीसाठी कागदपत्रे जमा करणे आवश्यक होते. मात्र आवश्यक कागदपत्रे जमा करण्यास त्यांनी विलंब केल्यामुळे सहायक प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, चंद्रपूर यांच्यासमोर दिनांक १५/६/२०२० रोजी सदर प्रकरण नोंदणीसाठी ठेवले असता त्यांनी आक्षेप लावून, संबंधित अधिवक्त्यास सूचना देवून प्रकरणाची नोंदणी करण्याबाबत निर्देश दिले. मात्र मे. श्रीवास्तव कन्स्ट्रक्शन कंपनीने आक्षेपांची पूर्तता न केल्याने प्रकरणाची नोंदणी झाली नाही. त्यानंतर मे. श्रीवास्तव कन्स्ट्रक्शन कंपनीने कागदपत्रे दाखल केली असता, सहायक प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, चंद्रपूर यांनी दिनांक ६/१२/२०२२ रोजी आक्षेपाची पूर्तता झाली म्हणून कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियमांतर्गत संकीर्ण प्रकरण क्र. ४/२०२२ नोंदणी करण्यात आले. प्रकरण अद्यापही न्यायप्रविष्ट असल्याने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना वसूलीची कार्यवाही करता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील अत्युच्च गुणवत्ताधारक आंतरराष्ट्रीय खेळाडूंना शासकीय सेवेत वर्ग १ पदावर थेट नियुक्ती देणेबाबत

**(८) ४९४८३ (१८-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक स्तरावर राज्याचे नाव उज्वल केलेल्या नाशिक जिल्ह्यातील अत्युच्च गुणवत्ताधारक आंतरराष्ट्रीय खेळाडूंना शासकीय सेवेत वर्ग १ पदावर थेट नियुक्ती देण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास क्रीडा मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या क्रीडा धोरणानुसार दिनांक २९/०९/२०१८ रोजी वा त्या सुमारास खेळाडूंना वर्ग १ पदावर थेट नेमणूक देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर जिल्हयातील खेळाडूंना शासकीय सेवेत वर्ग १ पदावर थेट नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०४-२०२३) :** (१), (२) व (३) होय, शासनाच्या दि.०५.०९.२०१८ व दि.२६.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत वर्ग १ पदी थेट नियुक्ती देण्यात आली आहे. गुणवत्ताधारक खेळाडूंच्या सेवा वापरून अनेकोत्तम गुणवत्तापूर्ण खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने खेळाडूंच्या थेट नियुक्तीच्या धोरणात समुचित सुधारणा करुन खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड किल्यावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानाच्या नुतनीकरणाच्या कामाबाबत

**(९) ४९७८८ (२४-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड किल्यावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानाचे नुतनीकरण सन २०१७ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवासस्थानाच्या नुतनीकरणाचे काम सुमारे ४ वर्षांपासून करण्यात येत आहे तसेच रायगड पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरहू कामे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानाची शासनाकडून पाहणी करण्यात आली आहे काय,पाहणी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (११-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानाच्या कामाचे कार्यारंभ आदेश दि.२२/०६/२०१८ रोजी देण्यात आले होते. परंतु पर्यटकांनी केलेल्या आगाऊ आरक्षणामुळे प्रत्यक्ष काम जानेवारी २०१९ मध्ये सुरु झाले असून डिसेंबर २०२१ मध्ये कामकाज पुर्ण झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणीटंचाईची समस्या कायमस्वरुपी सोडविण्यासाठी भावली योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत

**(१०) ५००५३ (२४-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ९७ गावांसाठी प्रस्तावित असलेल्या भावली प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या सुधारित ३१६ कोटी ४२ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या योजनेस मंजुरी देऊन जुलै,२०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर परिसरातील पाणीटंचाईची समस्या कायमस्वरुपी सोडविण्यासाठी भावली योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर योजनेचा कार्यरंभ आदेश दि.०४.०८.२०२२ रोजी देण्यात आलेला असून योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कार्यालयामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाने निश्चित केलेल्या वेतनानुसार वेतन मिळत नसल्याबाबत

**(११) ५०४१२ (१८-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कार्यालयामध्ये कंत्राटी पद्धतीने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्याना कंत्राटदार शासनाने निश्चित केलेल्या वेतनानुसार वेतन न देता कमी वेतन देवून कर्मचाऱ्यांचे आर्थिक शोषण करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांच्या वर्गवारीनुसार शासनाने कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगारांसाठी वेतन निश्चित केले आहे त्यानुसार वेतन मिळणे अपेक्षित असतांना कामगारांना महिना ८ हजार रुपये वेतन दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंत्राटी कामगारांनी संबंधित विभागास वेतनाबाबत विचारणा केली असता विभाग प्रमुख कंत्राटदारास पाठशी घालत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधित कंत्राटदाराविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (३१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही,
शासकीय कार्यालयामध्ये कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने निश्चित केलेल्या वेतनानुसार कंत्राटदार वेतन देत नसल्याबाबतची तक्रार आढळून आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुजरात येथे झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेबाबत**

**(१२) ५०६५६ (२१-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुजरात येथे झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या क्रिडा पथकाने दिनांक २७ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास देशातील सर्व राज्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण चषक प्राप्त केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रिडा स्पर्धेमध्ये सुर्वण, रौप्य व कांस्य पदक विजेत्या खेळाडूंना अनुक्रमे १० लक्ष, ७ लक्ष, ५ लक्ष एवढी बक्षीसाची रक्कम शासनाने जाहीर करावी अशी मागणी निवेदनाद्वारे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री तसेच क्रिडामंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासन निर्णय निर्गमित झाला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत महाराष्ट्र ऑलिंपिक असोशिएशन यांच्याकडून मागणी करण्यात आलेली होती. तथापि, दिनांक २१ .०९.२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री क्रीडा व युवक सेवा यांच्या उपस्थितीत ३६ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या ध्वज प्रदान सोहळयाच्या कार्यक्रमामध्ये स्पर्धेमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक विजेत्या खेळाडूंना अनुक्रमे ७.०० लक्ष, ५.०० लक्ष, ३.०० लक्ष एवढी बक्षीसाची रक्कम देण्याची घोषणा करण्यात आलेली आहे.त्यानुसार शासन निर्णय दि. १५.११.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईमधील दुकानांवर मराठी पाटया लावण्याबाबत

**(१३) ५०६५९ (१८-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील दुकानांवर मराठी पाट्या लावणे सरकार आणि पालिकेने बंधनकारक केले असतानाही पाच लाख दुकानांपैकी सुमारे दोन लाख दुकानांनी मराठी पाट्या लावल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तीन लाख दुकानांनी मराठीमध्ये पाट्या न लावण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच मराठी पाट्यांसाठी कलाकार उपलब्ध नसणे, मटेरिअल महागलेले असणे असे दुकानदारांकडून सांगितल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने ज्या दुकानांवर मराठी पाट्या लावल्या नाहीत अशा दुकानांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२२-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुकाने/आस्थापनांच्या केलेल्या सर्वेक्षणात ९४,५५२ दुकाने/आस्थापनांनी अधिनियमातील तरतुदीनुसार मराठी पाट्या संदर्भात अंमलबजावणी केल्याचे आढळून आले असून, १,६७,७८६ दुकाने/आस्थापनांचे मराठी नामफलक अधिनियमातील तरतुदीनुसार अन्य भाषेच्या तुलनेत लहान असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले.

(२) व (३) सदर अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांचे कार्यक्षेत्रातील व्यापारी व दुकानदार संघटना पदाधिकारी यांचेसोबत घेतलेल्या बैठकीमध्ये संबंधितांनी नामफलक बदली करण्यासाठी रंगारींची कमतरता असणे, पावसाचा कालावधी असल्याने बदल करताना अडथळा येणे व कोविड-१९ मुळे आर्थिक संकट इत्यादि मुद्दे उपस्थित करून मराठी पाटया लावण्याबाबत सूट मिळण्याची मागणी केली होती.

दरम्यानच्या कालावधीत फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशन व इतर यांनी मा. उच्च न्यायालयात मराठी पाटया लावण्यास सूट मिळणेकरीता याचिका दाखल केली होती. सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर, सदर संघटनेने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. १०६२९/२०२२ दाखल केली आहे. सदर याचिके प्रकरणी दिनांक ०७.११.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत याचिकाकर्ता फेडरेशचे सभासद असलेल्या दुकाने व आस्थापनांवर दंडात्मक कारवाईस स्थगिती दिली आहे.

(४) व (५) सदर अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १०.१०.२०२२ ते दिनांक ०४.११.२०२२ या कालावधीत त्यांचे कार्यक्षेत्रातील १९०४८ आस्थापनांना प्रत्यक्ष निरीक्षणे/ भेटी देण्यात आल्या, त्यापैकी १५,२६३ आस्थापनांनी उक्त अधिनियमाची अंमलबजावणी केली असल्याचे निर्दशनास आले असून, उर्वरित ३,७९५ आस्थापनांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत याचिकाकर्ता फेडरेशचे सभासद असलेल्या दुकाने व आस्थापनांवर दंडात्मक कारवाईस स्थगिती दिली आहे. सदय:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील जिल्हा कार्यालयात नोंदणी करण्यात आलेल्या कामगारांनी बनावट प्रमाणपत्र दाखल केल्याबाबत

**(१४) ५१२५२ (१८-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) परिसरात बांधकाम कामगार नोंदणीसाठी ९० दिवसांचा बांधकाम कामगार म्हणून अनुभव असल्याचे प्रमाणपत्र ग्रामपंचायतीच्या वतीने घेणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या हिंगोली जिल्हा कार्यालयात नोंदणी करण्यात आलेल्या कामगारांपैकी अनेक कामगारांनी बनावट सही व शिक्के वापरुन खोटे प्रमाणपत्र दाखल केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलीआहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मंडळाच्या हिंगोली कार्यालयात पंधरा हजार चारशे कामगारांची नोंदणी तर ५००० कामगारांची पुनर्नोंदणी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने चौकशी करुन बनावट सहीचे शिक्के व खोटे प्रमाणपत्र वापरुन शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आखाडा बाळापूर ग्रामपंचायत ता.कळमनुरी जि.हिंगोली येथील एकूण १२६३ बांधकाम कामगारांना दिलेले ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवकामार्फत दिले आहे काय, याची तपासणी करण्यासाठी सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडून ग्रामविकास अधिकारी आखाडा बाळापूर ता.कळमनूरी, जि.हिंगोली यांना कळविण्यात आले. त्या अनुषंगाने ग्रामविकास अधिकारी आखाडा बाळापूर ता.कळमनूरी, जि.हिंगोली यांनी वर नमूद १२६३ प्रमाणपत्र व त्यावरील शिक्के पुर्णतः खोटे असल्याचे सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली कार्यालयास कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) आखाडा बाळापूर ग्रामपंचायत ता.कळमनुरी जि.हिंगोली येथील एकूण १२६३ बांधकाम कामगारांना दिलेले ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र व त्यावरील शिक्के पूर्णत: खोटे असल्याचे ग्रामविकास अधिकारी यांनी सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली यांना कळविले आहे. त्यानंतर सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली कार्यालयाच्या दि.०३.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधिताविरूद्ध पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करणेबाबत ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आखाडा बाळापूर ता. कळमनुरी जि. हिंगोली यांना देण्यात आले. त्यानुसार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आखाडा बाळापूर ता.कळमनुरी जि.हिंगोली यांनी पोलीस स्टेशन, आखाडा बाळापूर येथे प्र.ख.अ.क्र. ४६०/२२ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र ग्रामीण जिवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन झालेल्या बचत गटांना फिरता निधी उपलब्ध करणेबाबत

**(१५) ५१५८८ (२०-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन झालेल्या बचत गटांना फिरता निधी म्हणून शासकीय निधी उपलब्ध केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन झालेल्या बचतगटांना शासनाचा निधी मिळत नसल्याचे माहे सप्टेबर, २०२२ व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील निधी बचत गटांना उपलब्ध न करण्याची कारणे काय आहेत आणि कधीपर्यंत हा निधी उपलब्ध केला जाईल,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आतापर्यंत ३,४०,०९९ स्वयंसहाय्यता समुहांना रु.५०५ कोटीचा फिरता निधी वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी अहमदनगर जिल्हयातील ७४७४ स्वयंसहाय्यता समुहांना रु.११.२० कोटीचा फिरता निधी वितरित करण्यात आला आहे. त्यातील कर्जत व जामखेड मधील अनुक्रमे ५९६ व ४७९ समुहांना रु.१५.०० लक्ष व रु.१५.४५ लक्षचा फिरता निधी वितरित करण्यात आला आहे.

सन २०२२-२३ करिता केंद्र शासनाकडून ऑगस्ट, २०२२ मध्ये निधी प्राप्त झाल्याने फिरता निधी वितरण प्रक्रिया सप्टेंबर, २०२२ पासून सुरु करण्यात आली आहे. सन २०२२-२३ मध्ये एकूण ५४,५१४ स्वयंसहाय्यता समुहांना रु. ८१.८५ कोटीचा फिरता निधी वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी अहमदनगर जिल्हयातील १५०१ समुहांना रु.२.२५ कोटीचा फिरता निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित पात्र समुहांना फिरता निधी वितरित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रकुल स्पर्धेतून "कुस्ती" या खेळाला वगळण्यात आल्याबाबत

**(१६) ५१६७९ (१८-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रकुल स्पर्धेतून "कुस्ती" या खेळाला वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर निर्णया विरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०४-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसारख्या वरिष्ठ अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये एखाद्या खेळाचा समावेश करणे अथवा एखादा खेळ वगळणे ही बाब शासनाच्या अखत्यारीत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण भागातील मुलभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी तत्कालीन शासनाने मंजूर केलेली कामे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याबाबत

**(१७) ५१६९५ (२१-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन शासनाने ग्रामीण भागातील मुलभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी मंजूर केलेली ८५० कोटी रुपयांची कामे रद्द करण्याचा निर्णय ग्रामविकास मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणामध्ये कोण-कोणती कामे रद्द करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, उक्त कामे एवढ्या मोठ्या प्रमाणात रद्द करण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासन मान्यतेने लेखाशिर्ष २५१५ १२३८ (मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे) अंतर्गत दि.०१ एप्रिल, २०२१ पासून मंजूर केलेल्या कामांपैकी ज्या कामांचे कार्यारंभ आदेश दिलेले नाहीत किंवा कार्यारंभ आदेश देऊनही कामे सुरु झालेली नाहीत, अशा सर्व कामांना दि.१९.०७.२०२२ व २५.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आलेली होती. सदर स्थगित केलेली कामे, शासन मान्यतेने दि.१२.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील सेवानिवृत्त हातपंप यांत्रिकी यांचे सेवानिवृत्तीनंतरची उपदाने देण्याबाबत

**(१८) ५१८४८ (२१-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागात हातपंप यांत्रिकी या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवानिवृत्ती नियमाप्रमाणे उपदान /अंशराशीकरण व सुधारित उपदान मंजूरीचे आदेश देऊनही गत २ वर्षापासून या विभागामध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना उक्त लाभ देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीचे लाभ देण्याबाबत जिल्हा परिषद गडचिरोलीचे विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख यांना वेळोवेळी विंनती करुनही गत २ वर्षापासून अनुदान नसल्याचे कारण सांगून सेवानिवत्तीचे लाभ देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय, आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हातपंप/विजपंप देखभाल व दुरुस्ती योजने अंतर्गत जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर पदनिर्मिती जिल्हा परिषदेकडून करण्यात येते. सदरील पदांपोटी वेतन व भत्त्यांचे दायित्व जिल्हा परिषदेचे असून हातपंप/वीजपंप देखभाल दुरुस्तीपोटी वर्गणी व जिल्हा देखभाल निधीमध्ये येणे रकमांची वसूली कटाक्षाने करुन कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते जिल्हा परिषदेने अदा करणे आवश्यक आहे. यासंदर्भात जिल्हा परिषद गडचिरोली यांना सूचना दिल्या आहेत. तसेच हातपंप व विजपंप देखभाल दुरुस्तीपोटी ग्रामपंचायती कडून जमा करावयाच्या वर्गणीत वाढ दिनांक २१.०७.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत मल्लमपोडुर (ता.भामरागड, जि.गडचिरोली) अंतर्गत तेंदुपत्ता संकलक मजुरांना मजूरी मिळत नसल्याबाबत

**(१९) ५१९२५ (२१-०१-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत मल्लमपोडुर (ता.भामरागड, जि.गडचिरोली) अंतर्गत मल्लमपोडुर, कुक्कामेटा, हिंदेवाडा, ईरपनार, मुरगल, भुसेवाडा, पिट्टेकसा, सुंदरनगर व मुसपाडी या नऊ गावातील तेंदुपत्ता हंगाम सन २०२०-२१ या कालावधीत तेंदुपत्ता तोडाईचे तेलंगाना राज्यातील कंत्राटदार यांनी ग्रामकोष समिती मल्लमपोडुर यांच्याशी करारनामा करुन कंत्राट घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त करारनाम्यानुसार कंत्राटदाराने दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ पर्यंत तेंदुपत्ता संकलक मजुरांना मजुरी देण्याचे मान्य करुनही अद्यापही नऊ गावातील तेंदुपत्ता संकलक मजुर मजुरीपासुन वंचीत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भामरागड यांनी ग्रामकोष समिती व कंत्राटदार यांच्या सुनावणीला कंत्राटदार अनुपस्थित राहिल्याने मजुरांना मजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कंत्राटदारांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) संबंधित कंत्राटदाराविरुध्द पोलिस स्टेशन, लाहोरी, जिल्हा गडचिरोली येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत नोंद करण्यात आली असून त्यानुसार पोलिस प्रशासनाकडून प्राथमिक चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा परिषदेच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अद्याप अर्ज भरण्यात आले नसल्याबाबत**

**(२०) ५१९६५ (२१-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदांच्या माध्यमातून विविध विभागामार्फत व्यक्तिगत लाभाच्या अनेक योजना राबविल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्हा परिषदेत गेल्या ५ महिन्यांपासून नव्या वर्षातील योजनेच्या अंमलबजावणीला निधी असतानाही सुरुवात झालेली नसल्यामुळे लाभार्थ्यांना योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या नव्या आर्थिक वर्षात या योजनांसाठी लाभार्थ्यांचे अर्ज भरुन त्यांना या योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे,
कृषि विभागामार्फत जिल्हा परिषद सेसफंडातून शेतकऱ्यांना अनुदानावर पाईप, विद्युतपंप, स्प्रेपंप, ताडपत्री इत्यादी कृषि साहित्य वाटपाच्या व्यक्तीगत लाभाच्या योजना राबविण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धा प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ५२०३३ (१८-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या क्रीडा चळवळीला बळकटी देण्यासाठी तसेच आगामी ऑलिम्पिक स्पर्धा डोळ्यासमोर ठेवून राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात ‘महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धा’ भरविण्यात येणार असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील स्पर्धा महाराष्ट्र दिनापासून भरविण्याचे नियोजित असताना देखील, अद्यापही या स्पर्धा भरवण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरील स्पर्धा प्रलंबितराहिल्याची कारणे काय आहेत, तसेच याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच उक्त स्पर्धा कधीपर्यंत भरवण्याचे राज्य शासनाचे नियोजन आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर स्पर्धांचे आयोजन दि.०२ ते १२ जानेवारी, २०२३ या कालावधीत यशस्वीरित्या करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तरनळी (ता. केज, जि. बीड) येथील काळूचीवाडी या गावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याबाबत**

**(२२) ५२०९४ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तरनळी (ता. केज, जि. बीड) या ग्रामपंचायतीच्या अंतर्गत काळुचीवाडी हे गाव येत असून सदर गावाचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल, मुख्यमंत्री पेयजल या पाणीपुरवठा योजनेत समावेश असून सदर योजनेतून उक्त गावाच्या कामाची निविदा देखील झालेली होती, परंतु शासनाच्या निर्देशानुसार या निविदेला स्थगिती देण्यात आल्याने सदर योजनेचे जलजीवन मिशन योजनेमध्ये रुपांतर झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलजीवन मिशन या योजनेच्या बीड जिल्हातील गाव, वाडी, वस्त्यांचा कृती आराखड्याची यादी जिल्हाधिकारी, बीड. यांनी प्रसिद्ध केलेली आहे, परंतू सदर यादी मध्ये काळुचीवाडी या गावाचा समावेश नसून तरनळी याच गावाचा समावेश आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू दोन्ही गावांमध्ये स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबवणे आवश्यक आहे, परंतू कृती आराखड्यामध्ये काळुचीवाडी या गावाचा समावेश नाही, उक्त योजना दोन्ही गावांसाठी राबविल्यास भविष्यामध्ये याचा फायदा दोन्ही गावांना होणार नाही तसेच काळूचीवाडी या गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत अस्तित्वात आल्यास उक्त योजना सुरळीत होण्यास अडचणी येऊ शकतात त्यामुळे तरनळी व काळुचीवाडी या दोन्ही गावांस स्वतंत्र योजना राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड. यांच्याकडे दिनांक ०१/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने काळूचीवाडी या गावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

काळूचीवाडी ही वस्ती तरनळी या गावाच्या अंतर्गत येत असल्याने व या गावाची नोंद संकेतस्थळावर नसल्याने जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या निर्देशानुसार व वरिष्ठ भू-वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, बीड यांनी दिलेल्या भुजल प्रमाणपत्रानुसार एक उद्भव विहीर प्रस्तावित करून काळूचीवाडी व तरनळी यांना स्वतंत्र उध्दरण नलिका, जलकुंभ, वितरण व्यवस्था इ. उपांगे प्रस्तावित करुन योजनेस सर्व मंजूरी प्राप्त असून, निविदा अंतिम झालेली आहे. त्यामुळै हे गाव नळ योजनेपसून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन कार्यवाही केलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील कोठारी येथील नळ पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(२३) ५२१०७ (२१-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठारी,जि.चंद्रपूर येथे खनिज विकास निधीतून साडेतीन कोटी रुपये खर्च करुन सन २०१७ मध्ये पुर्ण करण्यात आलेली नळ पाणी पुरवठा योजना ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे गावकरी या योजनेच्या पाण्यापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर पाणी पुरवठा योजना सुरळीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. योजना देखभाल दुरुस्तीअभावी बंद आहे.
(२) खनिज विकास निधीतून मौ. कोठारी नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यान्वित करून पुढील देखभाल व दुरुस्तीकरिता ग्रामपंचायत कोठारी यांना हस्तांतरीत करण्यात आली होती. देखभाल दुरुस्तीअभावी सदरची योजना बंद पडली होती. सुधारात्मक पुनर्जोडणीअंतर्गत सदर योजनेचा समावेश जल जीवन मिशन अंतर्गत करून योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेअंती कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. योजनेची कामे पुर्ण करून योजना पुनश्च कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यस्तरीय खेळांच्या स्पर्धा भरविल्या जात नसल्याबाबत

**(२४) ५२१२४ (२१-०१-२०२३). श्री. रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व.खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा सन २०१५ पासून, कै. भाई नेरकर खो-खो चषक स्पर्धा सन २०१८ पासून छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय कब्बडी स्पर्धा सन २०१८ पासून भरविल्या नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील स्पर्धा न भरविण्यामागील तसेच जागतिक स्तरावर चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना देण्यात येणारा शिव छत्रपती पुरस्कार २०१९ पासून देण्यात न आल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने क्रीडा विभागातील रिक्त पदांची भरती करण्याबाबत व क्रीडा विभागाला पूर्ण वेळ मंत्री देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०४-२०२३) :** (१),(२) व (३ ) कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे मागील तीन वर्षाच्या कालावधीत सदर स्पर्धा तसेच शिवछत्रपती पुरस्काराचे वितरण झालेले नाही. सन फेब्रुवारी /मार्च २०२३ मध्ये या स्पर्धोंचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय दि. १४.१२.२०२२ अन्वये शिवछत्रपती पुरस्काराची नियमावली सुधारित करण्यात आली असून त्यानुसार पुरस्कार निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच क्रीडा विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात निधी अभावी ग्रामीण भागातील  रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२५)  ५२१५१ (१९-०१-२०२३).   श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारीत ६ हजार २७७ कि.मी. चे ग्रामीण तसेच ८ हजार ८०३ कि.मी चे इतर मार्ग असून अतिवृष्टी व पुर परिस्थितीमुळे नुकसान होत असतांना त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी प्राप्त झाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद,अमरावती यांनी केलेल्या सर्वेक्षणानंतर रस्ते व पुलांच्या दुरुस्तीसाठी सन २०१९-२० ते सन २०२१-२०२२ या कालावधीत निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येऊनही त्यास मान्यता देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रस्ते व पुलांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०२-२०२३) :** (१) अंशत:  खरे आहे.

अमरावती जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत ३६९६ कि.मी. लांबीचे ग्रामीण मार्ग व ६८४ कि.मी. लांबीचे इतर जिल्हा मार्ग आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या व त्यावरील पुलांच्या दुरुस्तीसाठी दि.२८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३०५४-२९११ हे स्वतंत्र नवीन लेखाशिर्ष घेण्यात आले आहे. सदर लेखाशिर्षातंर्गत उपलब्ध होणा-या निधीमधून अतिवृष्टीमुळे बाधित रस्त्यांची कामे हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा परिषदेतील विविध विभागांमार्फत वैयक्तीक लाभांच्या योजनांपासून अनेक लाभार्थी वंचित असल्याबाबत**

**(२६)  ५२२३२ (२०-०१-२०२३).   श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :**  सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत वैयक्तीक लाभाच्या योजना राबवल्या जात असून यामध्ये शेतकऱ्यांना पाणबुडी मोटार, औषध फवारणी पंप, कडबाकुटी, ताडपत्री, संरक्षण अवजारे, तसेच पशुसंवर्धन विभागाकडून शेतकऱ्यांना शेळी, म्हैस घेण्यासाठी अनुदान तसेच महिला व बालविकास विभागाकडून शिलाई मशिन, पिकॉफोल मशीन, सायकल, संगणक प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षण अशा विविध योजना राबवल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अमरावती जिल्हा परिषदेतील विविध विभागाच्या वैयक्तीक लाभांच्या योजनांसाठी आर्थिक तरतूद असतांनाही अनेक पात्र लाभार्थी गत पाच महिन्यापासून अनुदानांपासून  वंचित असल्याचे माहे सप्टेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार पात्र लभार्थ्यांना वैयक्तीक योजनांना लाभ तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे,

कृषि विभागामार्फत जिल्हा परिषद सेसफंडातून शेतकऱ्यांना अनुदानावर पाईप, विद्युतपंप, स्प्रेपंप, ताडपत्री इत्यादी कृषि साहित्य वाटपाच्या योजना थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी) पद्धतीने राबविण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील वाशी खारेपाट भागातील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रलंबित प्रश्नाबाबत**

**(२७) ५२२८५ (२१-०१-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील वाशी खारेपाट भागातील ग्रामस्थांच्या वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, संबंधित ठेकेदाराकडून माहे एप्रिल, २०२२ पर्यंत काम पूर्ण करून पाणी पुरवठा सुरू करण्याबाबत ग्रामस्थांना आश्वासन देऊनही ठेकेदाराने अद्याप काम सुरू न केल्याने यंदाही ग्रामस्थांचे पाण्यासाठी हाल होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त कामास विलंब करणाऱ्या ठेकेदारावर तसेच ग्रामस्थांचा पिण्याचा प्रश्न त्वरीत सोडविण्याबाबत शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर योजनेचे काम कंत्राटदाराने देण्यात आलेल्या मुदतीत पुर्ण न केल्याने त्याचेवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. स्विकृत निविदेतील उर्वरित कामे निविदा कलम ३ (क) अंतर्गत अन्य कंत्राटदारास देण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर कंत्राटदाराने ९०% काम पुर्ण केले आहे. योजनेच्या चाचणीच्या कामास सुरवात करण्यात आली आहे.
सदर योजनेच्या कामास गुरुत्ववाहिनीचे काम करताना पाईपलाईन टाकणेसाठी जागेच्या हरकती घेण्यात आल्याने विलंब झाला आहे. सदर बाबी प्रशासकीय मार्गाने सोडविण्यात आल्या असून मार्च २०२३ पर्यंत योजना पुर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जल जीवन मिशन योजनेकरिता रस्ते खोदून टाकण्यात येत असलेल्या भूमिगत पाईपलाईनबाबत**

**(२८) ५२४३१ (२१-०१-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील ग्रामस्थांना नळाद्वारे शुद्ध पाणी देण्यासाठी गावोगावी जल जीवन मिशन योजना राबविण्यात येत असून त्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजने अंतर्गत गावातील प्रत्येक घराला नळजोडणी देण्याकरिता गावातील सुस्थितीत असलेली गल्ली, प्रभागातील रस्ते खोदून तात्पुरता दुरुस्त केल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोष आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दुरुस्त न झालेल्या रस्त्यांमुळे नालीकामाचे नुकसान झाल्यामुळे घाण पाणी घरात शिरणे, घराजवळ पाणी साचणे, पाणी रस्त्यातून वाहून रस्ते चिखलमय होत असल्याने दुचाकी वाहने घसरुन अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेमुळे नादुरुस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तसेच भूमिगत पाईपलाईनबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) पाणी साचून अपघात झाल्याची तक्रार प्राप्त नाही तथापि, जल जीवन मिशन अंतर्गत सर्व खोदकामे काळजीपूर्वक हाती घेणेबाबत व रस्ते विनाविलंब दुरुस्त करणेबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्याविषयी मिशन संचालक, जल जीवन मिशन यांना कळविण्यात आले आहे.

योजनेच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये खोदलेले रस्ते दुरुस्त करुन पूर्ववत करण्याकरीता तरतुद करण्यात येते व पाईप लाईन टाकण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर तात्काळ खोदलेले रस्ते, नाली दुरुस्त करुन पूर्ववत करण्यात येतात.
नळ जोडणीचे काम करीत असताना अशा प्रकारचे प्रश्न उद्भ्वल्यास ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायत फंड, १५ व्या वित्त आयोग अशा विविध लेखाशीर्षामधून उपाययोजना करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत रिद्धपूर विकास आराखडा, मुदगलेश्वर भारती देवस्थान अंबाडा (ता.मोर्शी) आणि कपिलेश्वर महाराज देवस्थान गव्हाण कुंड (ता. वरूड, जि. अमरावती) येथील कामास मंजुरी देण्याबाबत**

**(२९) ५२६४५ (२०-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत रिद्धपूर विकास आराखडा, मुदगलेश्वर भारती देवस्थान अंबाडा (ता.मोर्शी) आणि कपिलेश्वर महाराज देवस्थान गव्हाण कुंड (ता. वरूड, जि. अमरावती) असे तीन विकास आराखड्यांचा प्रस्ताव दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनास सादर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य सचिव स्तरावरील उच्चाधिकार समिती तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री स्तरावरील शिखर समितीकडून उक्त तीनही तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास तात्काळ प्राधान्य क्रमाने मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
(३) प्रश्नामध्ये नमूद ३ विकास आराखड्यापैंकी रिद्धपूर विकास आराखडयासंदर्भात दि.२५/०४/२०२२ रोजी मा.उच्चाधिकार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत विकास आराखडयातील सादर करण्यात आलेल्या कामांच्या प्रस्तावाबाबत उच्चाधिकार समितीने सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि.२९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि, शासनास अद्याप सुधारित प्रस्ताव अप्राप्त आहे. तसेच, मुदगलेश्वर भारती देवस्थान अंबाडा (ता. मोर्शी) आणि कपिलेश्वर महाराज देवस्थान गव्हाण कुंड (ता. वरूड, जि. अमरावती) या विकास आराखड्यासंदर्भात नियोजन विभागाच्या दि.१९ जूलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये माहिती/अहवाल सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि.२५/०५/२०२२ व दि.२९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि, या २ आराखडयाबाबतचा अहवाल अद्याप शासनास अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई, (जि. बीड) तालुक्यासाठी पूर्ण वेळ "तालुका क्रीडा अधिकारी" नियुक्त करणेबाबत**

**(३०) ५२७१६ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा अधिकारी नियुक्त करण्याचे शासनाने सन १९९६, २००१ व सन २०१२ च्या क्रीडा धोरणात मान्य केलेले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई तालुका हा जिल्हा दर्जाचा तालुका असून अंबाजोगाई येथे अपर जिल्हाधिकारी, अपर पोलीस अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग अशी जिल्हा दर्जाचे कार्यालये असल्यामुळे सदर ठिकाणी तालुकास्तरावर क्रीडा सुविधा निर्मिती व क्रीडा विकास करणे करिता पूर्ण वेळ तालुका क्रीडा अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे क्रीडामंत्री यांच्याकडे दिनांक ०९/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त तालुक्याच्या ठिकाणी पूर्ण वेळ क्रीडा अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०३-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा परिषदेमध्ये वैयक्तिक लाभाच्या योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ५२९५६ (२०-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषदेमध्ये लाभार्थ्यांसाठी नवीन आर्थिक वर्षाचा निधी उपलब्ध असूनही वैयक्तिक लाभाच्या योजना पाच महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्नुषंगाने सदर प्रलंबित योजना तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही,

अमरावती जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत जिल्हा परिषद, सेसफंडातून शेतकऱ्यांना अनुदानावर पाईप, विद्युतपंप, स्प्रेपंप, ताडपत्री इत्यादी कृषि साहित्य वाटपाच्या योजना थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी) पद्धतीने राबविण्यास मान्यता दिलेली असून त्यानुसार योजना राबविण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमगाव तथा सालेकसा तालुक्यातील (जि.गोंदिया) बनगाव प्रादेशिक पाणी पुरवठा करणाऱ्या प्रादेशिक योजनेला निधी देण्याबाबत**

**(३२) ५३०४९ (२१-०१-२०२३). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील आमगाव व सालेकसा तालुक्यातील ३६ गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या बनगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना निधी अभावी बंद होणार असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध ग्रामपंचायतींकडे पाणी पुरवठा योजनेची रुपये एक कोटी पेक्षा अधिक थकबाकी असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त गावातील पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) आमगाव व सालेकसा तालुक्यात वनगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना असून सदर योजनेतुन आमगाव नगरपंचायतसह ४८ गावांना पाणीपुरवठा होतो. या योजनेची पाणीपट्टी वसुली मोठया प्रमाणावर थकीत असल्याने जलव्यवस्थापन सभेत संस्था नियुक्त करुन वसुली करण्याबाबत ठराव पारित केला आहे.दरम्यान, ग्रामपंचायती थकीत पाणी पट्टी वसुलीची रक्कम भरणा करत आहेत.

सद्यस्थितीत प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देणेबाबत**

**(३३) ५३१६१ (१८-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल विकास कार्यक्रम मा.मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत माहे जुलै, २०२१मध्ये वा त्यादरम्यान शुभारंभ करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्याय, सदर योजनेव्दारे ३ महिन्यांत २० हजार प्रशिक्षित मनुष्यबळ आरोग्य क्षेत्रासाठी उपलब्ध करण्याचे उद्दीष्ट आहे व त्यासाठी सर्व जिल्ह्यांमधे ५०० प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्यात येणार होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विकास कार्यक्रमासाठी किती प्रशिक्षीत मनुष्यबळ उपलब्ध झाले तसेच आतापर्यत किती प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित झाली आहेत,

(४) असल्यास, शासनाने सर्व जिल्ह्यांमधे प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२५-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. कौ. रो. उ. व ना विभागाच्या दिनांक १९ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास कार्यक्रम" राबविण्यास मान्यता दिली असून, सदर कार्यक्रमाचा शुभारंभ जुलै, २०२१ मध्ये करण्यात आला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. सदर कार्यक्रमांतर्गत आरोग्य क्षेत्रासाठी ३ महिन्यात २० हजार प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत १९,४८५ प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे तसेच आतापर्यंत ५१३ प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

(४) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य व वैद्यकीय क्षेत्रामध्ये साथीच्या रोगाशी संबंधित उद्धवलेल्या परिस्थितीत कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे म्हणून राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय रुग्णालय तसेच उत्कृष्ट खाजगी रुग्णालयांच्या प्रशिक्षण केंद्रांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांच्याकडे ग्रीन चॅनेल व्दारे सुचीबध्द करण्यात येवून एकूण ३६ जिल्हयांमध्ये ५१३ प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यातील भू-जल पातळीचे सर्वेक्षणाबाबत**

**(३४) ५३३१४ (२१-०१-२०२३). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यातील भू-जल पातळीचे सर्वेक्षण वरीष्ठ भू-वैज्ञानीक भूजल सर्वेक्षण यंत्रणा, अहमदनगर यांच्या अंतर्गत झाले असून तालुक्यातील १३७ पैकी ७१ गावामधील भूजल पातळी खालावल्याचे अहवालात नमूद केले असून हे सर्वेक्षण सर्वसामान्य लाभार्थ्यांना विविध योजनेपासून वंचीत ठेवणारे आहे, याबाबत संबंधीत यंत्रणेने योग्य सर्वेक्षण केले नसल्याने जनआंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त तालुक्यातील भूजल पातळीचे पुन्हा फेर सर्वेक्षण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सन २०२१-२२ च्या भूजल मूल्यांकन अहवालानुसार पाथर्डी तालुक्यातील १३५ गावांपैकी ६३ गावे अतिशोषित पाणलोट क्षेत्र, ६ गावे अंशत: शोषित पाणलोट क्षेत्र तर ६६ गावे सुरक्षित पाणलोट क्षेत्रामध्ये येत आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**क्रीडा विभागाच्या दिरंगाईमुळे मराठमोळ्या मानलेल्या खो- खो, कबड्डी आणि कुस्ती खेळांच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन होत नसल्याबाबत**

**(३५) ५३४९१ (१८-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क्रीडा विभागाच्या दिरंगाईमुळे मराठमोळ्या मानलेल्या खो-खो, कबड्डी आणि कुस्ती खेळांच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त खेळांच्या स्पर्धेसाठी घोषित करण्यात आलेला रुपये १० कोटींचा निधी गत ५ वर्षापासून विनावापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तदृअनुषंगाने उक्त खेळांच्या स्पर्धेसाठी घोषित करण्यात आलेला निधी वापरात येण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०४-२०२३) :** (१),(२) व (३) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मागील तीन वर्षाच्या कालावधीत या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले नाही. फ़ेब्रुवारी/मार्च, २०२३ मध्ये या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय दि.१५.०२.२०२३ अन्वये या स्पर्धांच्या अनुदान मर्यादेत रु.५०.०० लक्ष वरून रु.७५.०० लक्ष इतकी वाढ करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जल जीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत रक्कम रुपये ५ कोटी वरील योजना**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणेबाबत**

**(३६) ५३७६९ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जल जीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत शासनाने दिलेल्या सूचनेनुसार ५ कोटी रुपये रक्कमेची योजना महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाकडून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,मौजे नेकनूर, सावंतवाडी, वैतागवाडी (ता.जि.बीड) या केज विधानसभा मतदार संघामध्ये ग्रुप ग्रामपंचायत असून उक्त गावच्या लोकसंख्येचा व उदभवातील अंतराचा विचार करता सदरहू गावचा प्रस्तावित नळ पाणी पुरवठा योजनांचे अंदाजपत्रक हे रक्कम रुपये ५ कोटी पेक्षा जास्त होणार आहे. तेव्हा सदर योजना सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मान्यतेने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद. यांच्याकडे हस्तांतरीत करणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाणीपुरवठा मंत्री व मुख्यकार्यकारीअधिकारी, जि.प. बीड. यांच्याकडे दिनांक ११/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, त्याअनुषंगाने उक्त निवेदनाच्या अनुषंगाने रुपये ५ कोटी पेक्षा जास्त असलेले प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरित केले आहे वा करण्यात येण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सविस्तर सर्व्हेक्षण करून यामध्ये नेकनुर तसेच नेकनुर अंतर्गत सावंतवाडी, वैतागवाडी या एकत्र ग्रुप ग्रामपंचायतचे एकत्रीत मिळून रु. १९५५.२१ लक्ष चे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी तांत्रिक मान्यता देऊन, दिनांक १३.१२.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत निविदा प्रक्रिया पुर्ण करून दिनांक २५.०१.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्राविण्यप्राप्त मल्लखांब खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत**

**(३७) ५३८४२ (१८-०१-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अखिल भारतीय खेल परिषद, भारत सरकार या परिषदेने मल्लखांब हा खेळ राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्तीकरिता समावेश करण्यासंबंधी सर्व राज्यांना आदेश निर्गमित केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अधिवेशनात झालेल्या चर्चेमध्ये तत्कालीन क्रीडा मंत्र्यांनी राज्यातील खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यासंदर्भात धोरण निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाच्या अनुषंगाने दिनांक ०८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून अद्यापपर्यंत उक्त समितीचा अहवाल शासनास सादर केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त अहवाल तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच राज्यातील आंतराष्ट्रीय स्तरावर प्राविण्यप्राप्त मल्लखांब खेळाडूंना शासकीय

सेवेत सरळ नियुक्ती देण्यासाठी मल्लखांब हा खेळ सदरच्या शासन निर्णयात समाविष्ट करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०४-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.
(२),(३) व (४) अपर मुख्य सचिव (सेवा), सा.प्र.वि. यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीची कार्यकक्षा ही शासन सेवेत खेळाडूंची थेट नियुक्ती व त्यासंदर्भातील इतर सेवा शर्तींशी निगडीत आहे. या संदर्भात सदर समितीने सादर केलेल्या शिफ़ारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. मुंबई येथे आयोजित पहिल्या विश्व मल्लखांब अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंनी प्राविण्य मिळविले आहे. तथापि, सदर खेळाचा समावेश अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये नाही. शासनाच्या दि.१५.११.२०१७ च्या शासन निर्णयानुसार “मल्लखांब” या खेळाचा समावेश ५ टक्के आरक्षणासाठी करण्यात आला आहे. तथापि, सदर खेळाचा प्रचार व प्रसार करुन सदर खेळास जागा उपलब्ध करुन देण्याची बाब तपासण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेव्दारे अनियमित पाणी पुरवठा व कुठे सौर पॅनलची योग्य देखभाल होत नसल्याबाबत

**(३८) ५३९६३ (२१-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेव्दारे कुठे अनियमित पाणी पुरवठा तर कुठे सौर पॅनलची योग्य देखभाल होत नसल्याचे केंद्राच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पथकाने माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या पाहणीत आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
माहे फेब्रुवारी -२०२२ ते मे-२०२२ या कालावधीत केंद्र शासनाच्या पथकामार्फत पाहणी करण्यात आली असून याबाबतच्या अहवालानुसार १०% कुटुंबांना अनियमित पाणी पुरवठा तसेच १% सौर उर्जा आधारित योजनांच्या देखभाल दुरुस्तीमध्ये अडचणी असल्याची निरिक्षणे नोंदविण्यात आली आहेत.
(२) जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत ज्या योजनांमधून ५५ LPCD पेक्षा कमी दराने पाणी पुरवठा होत आहे किंवा अनियमित स्वरुपाचा पाणी पुरवठा होत आहे अशा योजनांची कामे पुर्नजोडणी (Retrofitting ) मधून करण्यात येत असून त्याव्दारे नियमित पाणी पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
सौरऊर्जा अधारित पाणी पुरवठा योजनांच्या कामामध्ये व काही जिल्हयांकडून वापरण्यात येत असलेल्या सौर ऊर्जेवरील पंपाचे व सौर पॅनलचा देखभाल दुरुस्तीचा हमी कालावधी ५ वर्षे इतका निश्चित केला असून त्यासाठी एकूण रक्कमेच्या १०% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून राखून ठेवण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या पथदिव्यांची थकीत रक्कम देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत**

**(३९) ५३९६६ (२१-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील ६७०० ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या पथदिव्यांची १७९ कोटी रुपयांची पथदिव्यांची थकीत रक्कम शासनस्तरावरुन देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तसेच उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०२-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) ग्रामविकास विभाग, शासन ज्ञापन, दिनांक १९.१०.२०२२ अन्वये रुपये ६६२.१२ कोटी इतका निधी महावितरण कंपनीस पथदिव्यांचे विद्युत देयकाची थकबाकीपोटी ग्रामपंचायत ग्राहकनिहाय समायोजित करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे.त्यानुसार मराठवाड्यातील ६६६४ गावांपैकी ३४२७ मीटर्सची ऑगस्ट, २०२२ अखेर विद्युत देयकांची रु.१७९.८१ कोटी मुद्दलाची संपूर्ण रक्कम भरणा केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्वत नाही

---

**केज (जि. बीड) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी (ITI) नवीन वस्तीगृहाच्या इमारतीला मंजुरी देणेबाबत**

**(४०) ५४२५८ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी (ITI), नवीन वस्तीगृहाच्या इमारत बांधकामासाठी रु.९२,६०,३००/- एवढ्या खर्चाच्या अंदाजपत्रकास शासनाने सन २००८ साली प्रशासकीय मंजुरी दिली आहे. परंतू अद्याप सदर इमारतीचे बांधकाम झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुका हा मागास तालुका आहे. तसेच येथील ITI साठी भव्य इमारत असून सदर तालुक्यातील ग्रामीण भागातील होतकरू व गोरगरीब शेतकऱ्यांची मुले याठिकाणी मोठ्या प्रमाणात कौशल्य विकासाचे शिक्षण घेण्यासाठी येतात परंतू या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय नसल्याने त्यांची गैरसोय होत असून सदर ठिकाणी नव्याने आजच्या डी.एस.आर प्रमाणे अंदाजपत्रक करून मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक २८/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर निवेदनानुसार कामास मंजुरी देऊन, निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२८-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भ्वत नाही.

क्षेत्रीय कार्यालयाच्या अहवालानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था, केज, जि.बीड या संस्थेत ६ व्यवसाय असून एकूण प्रवेशक्षमता १३६ आहे व सद्यस्थितीत ९६ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या पाहता वसतीगृहाची सुविधा उपलब्ध झाल्यास प्रवेश घेण्यास इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांची संख्या कमी असल्याने भविष्यात देखील

प्रशिक्षणार्थी उपलब्ध होण्याची शक्यता कमी असल्याने इमारतीचा वापर होणार नाही, त्यामुळे वसतीगृहाची सद्यस्थितीत आवश्यकता नाही.

---

**श्री.वडमाऊली (वड) (ता. केज, जि. बीड) देवस्थानाला निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४१) ५४२६७ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.वडमाऊली देवस्थान,(वड) (ता.केज, जि.बीड) या ग्रामीण तीर्थक्षेत्राला शासनाने "ब" वर्ग दर्जा दिला आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी भाविकांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी विविध विकास कामे करणे गरजेची असून त्यासाठी ०२.०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १५/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदनुषंगाने सदरहू प्रकरणी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १०/११/२०२२ रोजीच्या बैठकीत राज्य निकष समितीव्दारा सदर तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) सदर देवस्थानचा प्राप्त प्रस्ताव जुन्या दरसूचीनुसार असल्याने विकास कामांची अंदाजपत्रके नवीन दरसुचीनुसार सादर करण्याबाबत दि.१६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, बीड यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेंबाळ (ता. मुल, चि.चंद्रपूर) येथील राष्ट्रीय पेयजल ग्रामीण पाणीपुरवठा योजनेबाबत**

**(४२) ५४८७७ (२१-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबाळ (ता. मुल, चि.चंद्रपूर) येथील राष्ट्रीय पेयजल ग्रामीण पाणीपुरवठा योजना सन २०१५ मध्ये समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी परस्पर लाखो रुपये उचलून निधीचा अपहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना बंद असून याबाबत संबंधित गावकऱ्यांनी अनेक तक्रारी व निवेदन दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०३-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) जिल्हा परिषद, चंद्रपूर वित्त विभागामार्फत चौकशी केलेली आहे. चौकशीच्या अनुषंगाने गावाच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष यांनी पैशांचा अपहार केल्याने दोषी आढळून आलेले आहे. अपहार रक्कमेपैकी आतापर्यंत रु. ३.०० लक्ष एवढी रक्कम यांच्या कडून वसूल करण्यात आलेली असून उर्वरीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्याकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरूरघाट (ता.केज जि.बीड) येथील नळ योजनेचे व पाण्याच्या टाकीचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(४३) ५५३२९ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूरघाट (ता. केज, जि.बीड) येथील नळ योजनेचे व पाण्याच्या टाकीचे काम मागील चार वर्षापासून अपूर्ण स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणच्या नळ योजनेचे व पाण्याच्या टाकीचे काम त्वरित पूर्ण करून सदर योजना कार्यान्वित करणेबाबत तसेच चार वर्षांपासून अपूर्ण काम ठेवणाऱ्या संबंधीतांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांच्याकडे दिनांक २५/०९/२०२१ व २४/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर अपूर्ण काम वेळेत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच अपूर्ण झालेल्या कामाबाबत संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नळ पाणी पुरवठा योजना शिरूरघाट, ता. केज, जि. बीड या योजनेस मुख्यमंत्री पेयजल योजना मंजूर होती. या योजनेस पाझर विहीर, उद्धरण वाहिनी, अप्रोच बंड, पंपिग मशनरी व पंप हाऊस हे. काम निविदेप्रमाणे करण्यात आलेली आहेत. परंतु जलकुंभाकरिता ग्रामपंचायत ने नियोजित जागा उपलब्ध करून दिलेली नाही. त्यानुसार मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमाची मुदत संपलेली असल्याने ही योजना आहे त्या स्थितीमध्ये अंतिम करून या गावाचा समावेश जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत नव्याने घेऊन उर्वरित कामाचे अंदाजपत्रक जल जीवन मिशन कार्यक्रमामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी शहरालगतच्या विस्तारित कुवारबाव मिऱ्या, शिरगावसह ३४ गावांसाठीच्या जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नळपाणी योजनेबाबत**

**(४४) ५५३५९ (२१-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी शहरालगतच्या विस्तारित कुवारबाव, मिऱ्या, शिरगावसह ३४ गावांसाठीच्या जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या १३५ कोटी रुपये खर्चांच्या नळपाणी योजनेची निविदा काढून पालघर येथील ठेकेदाराला हे काम देण्यात आले आहे, मात्र सदर ठेकेदाराने उक्त काम अन्य ठेकेदाराला दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विस्तारित प्रादेशिक नळ योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच हे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, रत्नागिरीत अनेक महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम करण्यास सक्षम ठेकेदार नसल्याने प्रलंबित आहेत किंवा उक्त ठेकेदारांचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने नागरिकांना उक्त सुविधांचा लाभ होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त योजनांचे काम सक्षम ठेकेदारांना देवून नियोजित वेळेत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०२-२०२३) :** (१) सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत केली जात असून योजनेचे मूळ मक्तेदार यांनी सदर कामांपैकी ४०% काम उप कंत्राट पध्दतीने देण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केला होता. सदरचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पनवेल यांनी अमान्य केला आहे.

(२) सदर प्रादेशिक योजनेचे काम पुर्ण करण्याकरीता दि.१७.१०.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून कामे पूर्ण करण्याकरीता २४ महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. तद्नंतर एक वर्षाकरीता मक्तेदाराने योजनेची यशस्वी चाचणी करुन द्यावयाची आहे. प्रस्तुत योजनेचे काम सुरु असून ठेकेदारामार्फत पाईप पुरवठा करणे, साठवण टाक्या, उर्ध्ववाहिनी व गुरुत्ववाहिनी इत्यादी कामांना सुरवात करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ग्रुप ग्रामपंचायत विलवडे, (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथे पिण्याच्या पाण्याची मोठया प्रमाणावर होत असलेल्या टंचाईबाबत

**(४५) ५५३९५ (२१-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रुप ग्रामपंचायत विलवडे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथे पिण्याच्या पाण्याची मोठया प्रमाणावर टंचाई भासत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावात प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना टप्पा क्रमांक २ अंतर्गत समाविष्ट करण्यास व मंजूरी देण्याबाबत स्थानिक ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावानुसार प्रस्ताव दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगांने सदर योजनेस किती निधीची मंजूरी देण्यात आली आहे तसेच उक्त नळपाणी पुरवठा योजनेच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) सदर ग्रामपंचायतीतील गावे/वाडयाकरीता जलजीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत रु.२.६७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या नळ पाणी पुरवठा योजनेस दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. तसेच याबाबत दिनांक ०७.०२.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे कवठा (ला) व मौजे होळी (ता. लातूर, जि.औसा) या दोन्ही गावास जाणारा ग्रामीण मार्ग ३५ या रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत

**(४६) ५५५८६ (२१-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कवठा (ला) व मौजे होळी (ता.औसा, जि. लातूर) या दोन्ही गावास जाणारा ग्रामीण मार्ग ३५ या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होत असून व वाहतुकीची गैरसोय होत असल्याने सदरील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदरील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर रस्ता नादुरुस्त असून त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेद्वारे सन २०२३-२४ मधील जिल्हा वार्षिक योजना आराखड्यामध्ये सादर करण्यात येत असून निधीच्या उपलब्धतेनुसार

रस्त्याचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील केंद्र व राज्य शासन पुरस्कृत असलेल्या जल जिवन मिशन योजने अंतर्गत ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची १०% लोकवर्गणी शासनामार्फत भरणेबाबत**

**(४७) ५६४७८ (२१-०१-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्र व राज्य शासन पुरस्कृत असलेल्या जल जिवन मिशन योजने अंतर्गत ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची १०% लोकवर्गणी शासनामार्फत भरण्याची मागणी मा. लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ नोव्हेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :** (१) जल जीवन मिशन योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनेची लोकवर्गणी शासनामार्फत भरणेबाबत या विषयावरील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दिलेल्या दि.१७.१०.२०२२ रोजीच्या निवेदनाची प्रत या कार्यालयास प्राप्त आहे.

(२) जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामस्थांवर लोकवर्गणीचा मोठा आर्थिक भार येत असल्याने गावांतर्गत कामांमधील ठराविक कामांवरील रकमेच्या ५/१० टक्के लोकवर्गणी आकारण्याबाबत केंद्र शासनाकडे दि.१५.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. याबाबत केंद्र शासनाने स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांबाबत योजनेच्या पुर्ण भांडवली रकमेवर तर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांबाबत गावांतर्गत कामांवर लोकवर्गणी अदा करणेबाबत दि.२३.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत. सदरची वस्तुस्थिती संबंधित लोकप्रतिनिधी यांना अवगत करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील जल जीवन मिशन निविदा प्रक्रिये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(४८) ५८५३७ (०३-०५-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील जलजीवन मिशन निविदा प्रक्रियेमध्ये आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त अहवालानुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. गुलाबराव पाटील (१५-०५-२०२३) :** (१) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तपासली असता, तपासणीअंती सदरच्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमेश इंटरप्रायजेस भुसावळ, पाणी पुरवठा ठेकेदार यांच्या कामांची चौकशी करुन लायसन्स काळया यादीत टाकणेबाबत**

**(४९) ६२५३६ (०३-०५-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमेश इंटरप्रायजेस भुसावळ, पाणी पुरवठा ठेकेदार यांच्या कामांची चौकशी करुन त्यांचा परवाना काळया यादीत टाकणेबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी सचिव (पाणीपुरवठा) यांना दिनांक २६.११.२०२२ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल शासनास सादर केला आहे काय तसेच अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१५-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात जल जीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या पाणी योजनांबाबत**

**(५०) ६२९८८ (०३-०५-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात जल जीवन मिशन अंतर्गत १ हजार ४७८ पाणी योजनांच्या कामांची प्रक्रिया राबविण्याचे कामकाज सध्या सुरु आहे मात्र जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनांपैकी २०० योजनांच्या कामांची निविदा प्रक्रिया चार वेळा रिकॉल करण्यात आली असूनही या पाणी योजनांच्या कामाची निविदा मक्तेदार भरत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील जल जीवन मिशन अंतर्गत २०० पाणी योजनांचे निविदा वारंवार प्रसिध्द केले जात आहे परंतू सध्या या योजनेअंतर्गत कामांची संख्या वाढली असून पाणी योजनांचे काम करणाऱ्या मक्तेदारांची संख्याही कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेची कामे करताना तांत्रिक बाबींची माहिती थोडयाच मक्तेदारांना असल्याने जळगावातील नागरिकांना या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त योजना राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१५-०५-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत जानेवारी, २०२३ दरम्यान ८८ पाणी पुरवठा योजनांच्या कामांना चार किंवा त्यापेक्षा जास्त वेळा रिकॉल करावे लागले.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,(कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.